Shikshan Prasarak Mandal's
**GOPAL KRISHNA GOKHALE COLLEGE, KOLHAPUR.**
'B' Ward, Subhash Road, Kolhapur Pin- 416 012. P. Box. No.-3
Phone No- (0231) 2642540 /2642340
NAAC Accredited "B" (C.G.P.A. 2.48) 3rd Cycle

E-Mail:- gkgcollege1950@gmail.com g260.cl@unishivaji.ac.in Web Site:- www.gkgcollege.com
U-DISE – 27341304307

**Vice Prin. Shri. N. T. Patil**
**M. A. M.Ed.**

**I/c Prin. Dr. R. B. Bhuyekar**
**M.A., M. Phil., Ph.D.**

Ref. No.GKG/ 512 /2024-2025

Date – 13/08/2024

## नोटीस

## राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (NMMS)

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये इ.११वी व इ.१२वी मध्ये प्रवेशित विद्यार्थी-विद्यार्थीनींना कळविणेत येते की, ज्या विद्यार्थी-विद्यार्थीनींनी NMMS परीक्षा पास झालेले आहे व शिष्यवृत्तीचा लाभ मिळालेला आहे. अशा विद्यार्थी-विद्यार्थीनींनी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टल (NSP) वर फॉर्म भरुन आवश्यक कागदपत्रासह कार्यालयात किंवा (फिजीक्स विभाग) येथे श्री.जे.जे.पवार, कनिष्ठ लिपिक यांच्याकडे दि.२०/०८/२०२४ पर्यंत जमा करावा. सविस्तर माहिती नोटीस बोर्ड व महाविद्यालयाच्या वेबसाईट वर लावणेत आलेले आहे.

**आवश्यक कागदपत्रे--**

१. महाविद्यालयाचे मूळ बोनाफाईड सर्टिफिकेट.

२. शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी-विद्यार्थीनींचे NMMS परीक्षेचे गुणपत्रक.

३. इ.१०वी व इ.११वी परीक्षेचे गुणपत्रक.

४. रु. ३,५०,०००/- च्या आतील पालकांचा उत्पनांचा दाखला. (तहसिलदार यांचा)

५. ज्या प्रवर्गातून विद्यार्थी-विद्यार्थीनीं शिष्यवृत्ती परीक्षा पास झाले त्या प्रवर्गातील जातीचा दाखला.

६. विद्यार्थी-विद्यार्थीनी व वडीलांचे आधारकार्ड झेरॉक्स.

७. बँक पासबुक झेरॉक्स.

G.K. GOKHALE COLLEGE KOLHAPUR

प्र.प्राचार्य,
गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय,
कोल्हापूर.

# शिक्षणाधिकारी (योजना),

## जिल्हा परिषद, कोल्हापूर

सोमवार पेठ, हत्तीमहल, गंजी गल्ली, कोल्हापूर -४१६००२

Email – eoschemekop@gmail.com


जा.क्र.शिवियोको/NMMS/२०२४/२७३ दिनांक २३/०७/२०२४

**<u>अत्यंत महत्त्वाचे कलमर्यादित</u>**

प्रति,

**मुख्याध्यापक,**
**सर्व संबंधित शाळा, कोल्हापूर जिल्हा.**

विषय : **राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (NMMSS) अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2024-25 साठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टल (NSP) वर ऑनलाईन अर्ज भरणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन सूचित करण्यात येते की, शालेय शिक्षण व साक्षरता विभागाच्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजनेसाठी (NMMS) शैक्षणिक प्रकल्प वर्ष 2024-25 साठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टल (NSP) वर नवीन व नुतणीकरण अर्जाच्या ऑनलाईन नोंदणी करण्याकरीता पोर्टल उघडणेबाबत केंद्र शासनाने निर्देशित केलेले आहे.

शैक्षणिक वर्ष 2024-25 करीता कार्यवाही करण्याकरीता कालमर्यादा ठरवून दिलेल्या आहेत, शैक्षणिक वर्ष 2024-25 साठी एनएसपी पोर्टल साठी ठरविण्यात आलेल्या कालमर्यादा खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| Last date for Application Submission (Student Level) | 31st August 2024 |
| Last date for INO Level Verification | 15th September 2024 |
| Last date for Second Level Verification | 30th September 2024 |

वरील शैक्षणिक बाबी लक्षात घेता, केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार जिल्हयातील संबंधित शाळांनी नवीन व नुतणीकरण अर्जाच्या ऑनलाईन नोंदणीची कामे उक्त प्रमाणे निर्धारित वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे, तसेच यावर्षी कोणत्याही प्रकारे मुदतवाढ दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी. शिष्यवृत्ती पात्र / अपात्र या बाबीसाठी आधार महत्वाचे असेल.

ज्या विदयार्थ्याचे वय वर्षे १८ पूर्ण आहे त्यांना आधार कार्ड अनिवार्य आहे. तसेच संबंधित विदयार्थ्यांचे आधारकार्ड हे बैंक खात्यास लिंक असणे अनिवार्य आहे.

अल्पवयीन अर्जदारांसाठी सर्व अर्जदार ज्यांनी नोंदणीच्या तारखेला १८ वर्षाचे वय पूर्ण केले नाही, त्यांना त्यांच्या पालकांच्या / कायदेशीर पालकांच्या संमतीने ऐच्छिक आधारावर आधार वापरून नोंदणी करण्यास प्रोत्साहित केले जाईल. जर अशा अर्जदारांना आधारकार्ड दिलेले नसेल तर ईआयडी वापरून नोंदणी करता येऊ शकेल, तथापि सदर प्रकरणी अल्पवयीन अर्जदारांना आधारकार्ड प्रदान केलेला नसेल, किमान एक पालक किंवा कायदेशीर पालकांचा आधारकार्ड चा वापर करता येईल. अशा प्रकरणी एक पालक किंवा कायदेशीर पालकांना लाभार्थी मानले जाईल.

- अल्पवयीन विद्यार्थ्यांना आधारकार्ड शिवाय नोंदणी केल्यास, त्यांना ऐच्छिक आधारावर आधार जमा करण्यास प्रोत्साहीत करण्यासाठी नियमित एसएमएस पाठविले जातील.
- ईआयडी च्या बाबतीत आधारकार्ड होईपर्यंत शिष्यवृत्तीचे वितरण होणार नाही.
- दोन्ही प्रकरणांमध्ये आधार हस्तगत केला जात असल्याचे बोनाफाईड प्रमाणपत्र काढून टाकण्यात आले आहे.

**खालील सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.**

१. पालकाचे उत्पन्न रु. ३,५०,०००/- पेक्षा जास्त नसावे. उत्पन्नाचा दाखला हा सक्षम प्राधिकारी यांच्या सहीचा आवश्यक आहे.

२. शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित (अंशत: अनुदानितसहित) शाळेतील विद्यार्थ्यांना सदर योजना लागू आहे.

3. केंद्रीय विद्यालय, जवाहर नवोदय विद्यालय तसेच राज्य शासनाकडून वसतिगृहाची सवलत घेत असलेल्या शासकीय तसेच खाजगी विनाअनुदानित शाळेतील खाजगी अनुदानित सैनिकी शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अपात्र आहेत.

४. इयत्ता १०वी नंतर शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्याने व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेत असल्यास त्यास पुढील शिष्यवृत्तीसाठी अपात्र करण्यात येईल.

५. इयत्ता १०वी मध्ये सर्वसाधारण (जनरल) विद्यार्थ्यास ६० टक्केपेक्षा अधिक गुण (अनुसूचित जाती / जमातीच्या वि द्यार्थ्यास ०५ टक्के सुट) इयत्ता ९वी मधून १० वी मध्ये गेलेले विद्यार्थी व ११ वी मधून १२वी मध्ये गेलेले विद्यार्थी प्रथम प्रयत्नात पास होणे आवश्यक आहे. .

६. शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांचे राष्ट्रीयकृत बँकेतील विद्यार्थ्याच्या नावाचेच खाते असावे, संयुक्त खाते नसावे.

७. शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांचे आधार कार्ड असावे व विद्यार्थ्याच्या बँक खात्याशी आधार कार्ड संलग्न असावे.

८. विद्यार्थीची ज्या प्रवर्गातून निवड झाली आहे त्या प्रवर्गातूनच शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरावा व जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

९. विद्यार्थ्याकडून शाळेच्या शिस्तीचा अथवा शिष्यवृत्तीच्या कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास शिष्यवृत्ती स्थगित करण्यात येईल अथवा संपुष्टात आणण्यात येईल.

१०. जर एखाद्या विद्यार्थ्यास चुकीच्या माहितीच्या आधारे शिष्यवृत्ती दिली गेल्याचे निदर्शनास आल्यास त्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व त्यास प्रदान करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीच्या रकमेची वसूली करण्यात येईल.

११. कोणत्याही कारणामुळे एका शैक्षणिक वर्षाचे अंतर पडल्यास नूतनीकरण शिष्यवृत्ती अर्ज भरता येणार नाही. तसेच शिष्यवृत्तीच्या नियमांच्या आधारे एकदा बंद केलेली शिष्यवृत्ती कोणत्याही परिस्थितीत पुनरुज्जीवित केली जाऊ शकत नाही.

१२. शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावयाचे शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर कोणत्याही प्रकारच्या फरकासाठी विद्यार्थ्यांचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

13. सध्या ज्या शाळेत विदयार्थी शिक्षण घेत आहेत त्या शाळेतूनच सदर विदयार्थ्याचा फॉर्म भरणेत यावा.

**14. एनएमएमएस, फ्रेश व रिनीवल विदयार्थ्यांचे ओ.टी.आर. नंबर जनरेट करुन Face Authentication करुन घ्यावे व फॉर्म भरावे.**

**आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे :-**

१. सध्या शिकत असलेल्या शाळेचे बोनाफाईड सर्टिफिकेट

२. शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांचे एन.एम.एम.एस. परीक्षेचे गुणपत्रक,

३. शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांचे गतवर्षाचे (इयत्ता ९वी, १०वी, ११वी) गुणपत्रक.

४. सक्षम प्राधिकारी यांच्या सहीचा पालकाचा रु. ३,५०,०००/- आतील उत्तपन्नाचा दाखला.

५. ज्या प्रवर्गातून विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षा पात्र झाला त्या प्रवर्गाचा (जातीचा) सक्षम प्राधिकारी यांच्या सहीचा दाखला

६. आधार कार्ड प्रत.

७. बँक पासबुकची प्रत.

**ऑनलाईन माहिती भरण्याकरिता केंद्र शासनाकडून प्राप्त महत्वाच्या सूचना खालीलप्रमाणे आहेत.**

१) एखाद्या विद्यार्थ्याने चूकीची माहिती भरली असल्यास त्यास Defect करावे Reject करु नये. जो विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्रच नाही तरी पण त्याने माहिती भरली असल्यास त्यास Reject करावे.

२) Registration Details मध्ये Community / Categary या कॉलम मध्ये विद्यार्थी ज्या प्रवर्गातून शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरला आहे. तो प्रवर्ग (SC/ST/OBC/GENRAL) निवडावा. जे विद्यार्थी (SBC/ VINT/NT-1, NT-2, NT-3, NT-D ) या प्रवर्गातून शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेले आहे त्यांनी ओबीसी हा प्रवर्ग निवडून माहिती भरावी.

3) Academic Details मध्ये Competitive Exam Qualified मध्ये NMMSS निवडावे. Exam Conducted by मध्ये महाराष्ट्र टाकावे.

४) Admission Fees, Tution Fees, Mise Fees यामध्ये ० टाकण्यात यावा. यामध्ये कोणताही बदल करण्यात येऊ नये.

5) Basic Details मधील Marital Status मध्ये Unmarried निवडावे. Parents Profession मध्ये Other हा पर्याय निवडावा.

6) Previous Board/University Name मध्ये Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary, Pune निवडावे.

शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या बँक खात्याचा तपशील (IFSC CODE, BANK ACCOUNT NUMBER ETC) योग्य टाकण्यात यावा. सदर पोर्टल हे ऑनलाईन व कालमर्यादित असल्यामुळे आपल्या कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक शाळेने पात्र विद्यार्थ्यांची अचूक माहीती पोर्टलवर विहीत मुदतीत भरणे बंधनकारक आहे. सदर विद्यार्थ्यांची माहिती भरण्यास विलंब व कोणतीही टाळाटाळ झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शाळेची राहील.

करीता केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार उपरोक्त वेळापत्रक आपल्या तालुक्यातील सर्व शाळा व INO / HOl यांना पाठविण्यात यावी. शिष्यवृत्तीधारक कोणताही विद्यार्थी हा ऑनलाईन माहिती न भरल्यामुळे शिष्यवृत्ती पासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील, याची नोंद घ्यावी.

शाळास्तरावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांनी online form भरून शाळा स्तरावर verification झालेच्या दुसऱ्या दिवशी विद्यार्थी निकषाबाबतची सर्व कागदपत्रे घेऊन शिक्षणाधिकारी योजना कार्यालयात उपस्थित राहून जिल्हास्तरावर verification पूर्ण करून घेणे, तसेच माहिती पडताळणी वेळेस सोबतच्या नमुन्यातील माहिती योजना कार्यालयास सादर करणेसंदर्भात सर्व मुख्याध्यापकांनी दक्षता घ्यावी.

**(अनुराधा म्हेत्रे)**
शिक्षणाधिकारी (योजना),
जिल्हा परिषद, कोल्हापूर

प्रत कार्यवाहीस्तव- गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती सर्व कोल्हापूर जिल्हा
प्रशासन अधिकारी, म.न.पा. कोल्हापूर.

2/- त्यांनी उपरोक्तप्रमाणे विहित कालमर्यादेत आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत आपलेस्तरावरुन मुख्याध्यापकांना सूचित करावे.

प्रत-मा. शिक्षण संचालक (योजना), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.